# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १९६/2023

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रम 2023-24 प्रवेश प्रक्रिया (पूर्वतयारी)**

**(पीएच.डी. अभ्यासक्रम 2023 प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त संशोधन केंद्र/संशोधक मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करणेबाबत..)**

सदर परिपत्रकाव्दारे मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग व मा. प्राचार्य/संचालक सर्व संशोधन केंद्र (स्वायत्त महाविद्यालये वगळून ) यांना कळविण्यात येते की, पीएच.डी. अभ्यासक्रम प्रक्रिया 2023 -24 ही विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक 07 नोव्हेंबर, 2022 रोजी प्रसिध्द केलेल्या पीएच.डी. पदवी प्रदान करण्यासाठी किमान मानके आणि प्रक्रिया - 2022 (University Grant Commission - Minimum Standard and Procedure for Award of Ph.D. Degree - Regulation 2022) यानुसार राबविण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी.

सदर प्रक्रियेसाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथील मान्यताप्राप्त संशोधक मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने रिक्त जागा अद्ययावत करण्यासाठी संशोधन केंद्र व संशोधक मार्गदर्शकांसाठी सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक ती प्रक्रिया दिनांक 20 सप्टेंबर, 2023 पर्यंत पूर्ण करावी. सदर प्रक्रिया पूर्ण करताना काही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन,पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. 020-71533633 अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

संदर्भ: शै.प्रवेश/ 3723
दिनांक: 04/09/2023

**प्रत:**

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील /संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी.

D:\PET 2023\Circulars.docx

## पीएच.डी. अभ्यासक्रम २०२३-२४ प्रवेश प्रक्रिया

**पीएच.डी. अभ्यासक्रम २०२३-२४ प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त संशोधन केंद्र/संशोधक मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे पूर्ण करावी.**

### प्रक्रिया -१: संशोधन केंद्राने करावयाची प्रक्रिया:

१. सर्वप्रथम संशोधन केंद्रानी त्यांच्या BOD Login मधून २०२३-२४चे संशोधन केंद्र संलग्निकरणाचे पत्र अपलोड करावे. त्यानंतर संशोधन केंद्रांना Pending for Approval असे status दिसेल.

२. विद्यापीठ संबंधित विषयात 2023-24 साठी संलग्निकरण असल्याबाबत खात्री करून Approved करेल.

३. संबंधित विषयास Approval मिळाल्यानंतर त्यांचेकडील त्या विषयातील संशोधक मार्गदर्शक व सहयोगी मार्गदर्शक यांना जागा अद्ययावत करण्यासाठी पुढील प्रक्रिया पूर्ण करता येईल.

### प्रक्रिया -२ : संशोधक मार्गदर्शकांनी करावयाची प्रक्रिया:

१. संशोधक मार्गदर्शकांनी सर्वप्रथम त्यांच्या लॉगीनमध्ये त्यांच्याकडील रिक्त जागा घोषित करण्यासाठी संबंधित संशोधन केंद्र जागा घोषित करण्यासाठी उपलब्ध असल्याबाबतची खात्री करावी. जर नसल्यास....

   a. संबंधित संशोधन केंद्रांकडे त्या विषयामध्ये संलग्निकरण असल्यास त्यांना प्रक्रिया - १ पूर्ण करण्याबाबत अवगत करावे.
   b. संबंधित संशोधन केंद्रांकडे त्या विषयामध्ये संलग्निकरण नसल्यास ते संशोधन केंद्र पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया २०२३-२४ साठी पात्र असणार नाही.

२. संशोधक मार्गदर्शकांकडील रिक्त जागा अद्ययावत करण्यासाठी संशोधन केंद्र उपलब्ध असल्यास संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या BOD Login च्या Teacher Login व्दारे Login करावे.

   a. Login झाल्यानंतर वैध शिक्षक मान्यता पत्र (Valid Teacher Approval) व संशोधक मान्यता पत्र (Valid Guideship Letter) अपलोड करावे.
   b. मुळ नियुक्त असलेल्या महाविद्यालयामध्ये संशाधेन केंद्र नसल्यास संशोधक मार्गदर्शकांना सहयोगी होण्यासाठी मुळ नियुक्त महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र व सोबत जोडलेले हमीपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.
   c. Vacant Position for Ph.D. Admission 2023 या मधून Link Open करावी.
   d. Declare Vacancies या टेबल मधील Edit Tab वर Clik करावे.
   e. मार्गदर्शकांना रिक्त जागांची माहिती भरताना Approval संदर्भातील माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.

३. विद्यापीठ परिपत्रकानुसार नव्याने मान्यता प्राप्त मार्गदर्शक, त्यांच्या पदोन्नतीने पीएच.डी. साठी विहीत संशोधक विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व वेळोवेळी त्यांच्याकडील संशोधक विद्यार्थ्यांचे पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यामुळे झालेल्या रिक्त जागा इत्यादी सर्व पात्र मार्गदर्शकांनी आपल्या लॉगीनमधून ऑनलाईन पद्धतीने अद्ययावत कराव्यात.

४. मार्गदर्शकाकडे रिक्त जागा नसल्यास अथवा त्यांना या वर्षी पीएच.डी. प्रक्रियेसाठी एकही जागा घोषित करावयाच्या नसल्यास त्यांनी BOD Login मधून शून्य जागा अद्ययावत करणे आवश्यक आहे.

५. काही मार्गदर्शकाच्या लॉगीनमध्ये पीएच.डी. पूर्ण झालेले/संशोधन केंद्र बदलेले / प्रवेश रद्द झालेले विद्यार्थी दिसत असतील तर त्यांनी त्यांच्या लॉगीन मधून विद्यापीठाने निर्गमित केलेले Declaration/ पत्र अपलोड करावे जेणेकरून त्यांच्या लॉगीनमधून सदर विद्यार्थ्यांची नोंद रद्द करता येईल.

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY Admission Section PUNE-7

**प्रक्रिया -3 : संशोधन केंद्राने करावयाची प्रक्रिया:**

प्रक्रिया -१ व २ पूर्ण झाल्यानंतर संशोधन केंद्राच्या BOD लॉगीनमध्ये ज्या संशोधक मार्गदर्शकांनी जागा अद्ययावत केल्याबाबतचा तपशील उपलब्ध होईल, त्याबाबत खालील प्रक्रिया पूर्ण करावी.

१. संशोधक मार्गदर्शकांनी अपलोड केलेले वैध शिक्षक मान्यता पत्र, संशोधक मान्यता पत्र, सहयोगी झालेले संशोधक मार्गदर्शकांचे मुळ नियुक्त महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र व हमीपत्र संशोधन केंद्रानी तपासून ते वैध असल्याबाबतची खातरजमा केल्यानंतर Approved करावे. यापैकी सर्व मान्यता व हमीपत्र, ना-हरकत प्रमाणपत्र उपलब्धेबाबतची खात्री संबंधित संशोधन केंद्रांनी करावी.

२. संशोधन केंद्राने ज्या संशोधक मार्गदर्शकांना Approve केले आहे त्यांच्याच अद्ययावत केलेल्या रिक्त जागांची माहिती Confirm करावी.

३. संशोधन केंद्रांनी त्यांच्याकडील सर्व विषयांच्या पीएच.डी. प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती भरावी.

४. सर्व माहिती भरल्यानंतर त्याची प्रिंट घेऊन त्यावर प्राचार्य/संचालक यांचे सही व शिक्क्यासह एक प्रत शैक्षणिक प्रवेश विभागात जमा करावी.

५. सदरील प्रिंट जमा केल्यानंतरच संशोधन केंद्रांच्या रिक्त जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याबाबतची नोंद घ्यावी.

**सर्वसाधारण सूचना:**

१. विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्देशाप्रमाणे संशोधक मार्गदर्शकाचे शिक्षक मान्यतेचे स्वरूप कायमस्वरूपी /नियमित असणे आवश्यक आहे. यामध्ये काही बदल झाला असल्यास तो तात्काळ विद्यापीठास कळविणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

२. एका संशोधकाला एकाच संशोधन केंद्रासोबत संलग्नित राहता येईल, याची नोंद घ्यावी.

३. संशोधक मार्गदर्शक संशोधक केंद्राबाहेरील असल्यास याबाबत विद्यापीठाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

४. विद्यापीठाचे संशोधन केंद्र मान्यता पत्र शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चे असल्याशिवाय प्रवेश प्रक्रिया करू नये.

५. सर्व विद्यापीठ विभाग/ सर्व संलग्नित संशोधन केंद्रांनी प्रवर्गनिहाय एकूण आरक्षणाच्या टक्केवारीबाबत शासन निर्णयातील तरतुदी व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील तरतुदीनुसार रिक्त जागा घोषित करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

६. विद्यापीठ विभागांनी प्रक्रिया - १ वगळून वरील सर्व सूचनेनुसार जागा अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करावी.

७. वरील सर्व प्रक्रिया खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विहीत मुदतीत करावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क:
Email: phdtracking_support@pun.unipune.ac.in
Phone: 020-71533633

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
Admission Section
★PUNE-7.★

...

D:\PET 2023\Circulars.docx

# हमीपत्र

**मुळ नियुक्त असलेल्या महाविद्यालयामध्ये संशाधेन केंद्र नसल्यास संशोधक मार्गदर्शकांना सहयोगी होण्यासाठी हमीपत्र**

मी ------------------------------------------, संशोधक मार्गदर्शक -------------------- --------------------------------------------------------------------या महाविद्यालयात नियमित पदावर कार्यरत असून मला ------------ या विषयात संशोधक मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाकडून दिनांक ------------ ते --------------- पर्यंत मान्यता मिळाली आहे. मी कार्यरत असलेल्या महाविद्यालयात सदरील विषयाचे संशोधन केंद्र नाही. तसेच मी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त कोणत्याही संशोधन केंद्रात सहयोगी झालेलो नाही किंवा माझ्याकडे इतर संशोधन केंद्रात एकही विद्यार्थी कार्यरत नाही. त्यामुळे मी ---------------- ------------------------------------------------------------------- या संशोधन केंद्रात सहयोगी होण्यास इच्छूक .आहे.

वरील सर्व नमूद माहिती ही सत्य आहे, यामध्ये काही असत्यता आढळून आल्यास भविष्यात निर्माण होणा-या अचडणीस सर्वस्वी मी जबाबदार असेल.

स्वाक्षरी : ----------------

(संशोधक मार्गदर्शकाचे नाव व स्वाक्षरी)

मार्फत

मा.प्राचार्य/संचालक यांचा सही व शिक्का